<u>**अतारांकित प्रश्नोत्तरांची नववी यादी**</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील नगरपरिषदांतील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) १५१३३ (२९-०४-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदेच्या मंजूर आकृतीबंधाप्रमाणे नगरपरिषद नगररचना विभाग, अतिक्रमण विभाग, लेखापरिक्षण लेखा सेवा या संवर्गातील पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक नगरपरिषदेला कोटयवधी रुपयांचा निधीचे वाटप झालेले असतांनाही रिक्त पदे न भरता अपात्र कर्मचा-यांकडून काम करुन घेण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१७) :** (१) होय.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी-ब चे नियुक्ती प्राधिकारी हे विभागीय आयुक्त तथा

प्रादेशिक संचालक व श्रेणी-क चे नियुक्ती प्राधिकारी हे जिल्हाधिकारी असल्याने, संचालनालयाने दिनांक २२/०२/२०१६ च्या परिपत्रकान्वये जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक सर्व यांना रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्याविषयी कळविले होते.

नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०७/०३/२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांना घोषित करण्यात आले आहे. तसेच, संवर्गातील १४८३ रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे, बिंदुनामावली प्रमाणित करणे, पदोन्नतीची कार्यवाही करणे ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर सरळसेवेने पदे भरण्याची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

नगररचना व विकास सेवा संवर्गातील रिक्त पदे शासनाच्या नगररचना संचालनालयस्तरावर भरण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण-५०१६/ १९४०/ प्र. क्र. २४ /नवि-२७, दिनांक १३/०४/२०१७ अन्वये निर्णय घेतला आहे.

(४) वरीलप्रमाणे.

---

**येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभुमी स्मारक परिसरात सोयी-सुविधा पुरविणेबाबत**

**(२) १९३८० (१६-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभुमी स्मारक परिसरात प्रशिक्षण केंद्र, ग्रंथालय, वाचनालय, अतिथी निवासस्थान इ. सुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी मिळणेसाठी बार्टी, पुणे यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१७) :** (१) होय.

(२) सदर प्रस्तावावर नियमानुसार योग्यती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथेरान (जि.रायगड) या पर्यटनस्थळी ई-रिक्षा, सीएनजी किंवा बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षांना परवानगी मिळणेबाबत**

**(३) १९४९० (१६-०८-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** तारांकित प्रश्न क्रमांक १८०९५ ला दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) या पर्यटन स्थळी ई-रिक्षा, सी.एन.जी. रिक्षा अथवा बॅटरीवर चालणारी रिक्षा चालविण्यास परवानगी मिळण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शिफारस वजा अभिप्राय शासनास सादर केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्तांना या प्रस्तावास शिफारस वजा अभिप्राय देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विभागीय आयुक्तांना या प्रस्तावास शिफारस वजा अभिप्राय देण्यास अजून किती कालावधी लागणार आहे व अभिप्राय दिला असल्यास त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) माथेरान ता.कर्जत जि.रायगड या पर्यटन स्थळी ई-रिक्षा, सी.एन.जी अथवा बॅटरीवर चालणारी रिक्षा चालविण्यास परवानगी मिळण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांचे कार्यालयाकडून शासनास दिनांक १८/०५/२०१६ च्या पत्रान्वये शिफारस वजा अभिप्रायासह प्रस्ताव प्राप्त झाला होता. मात्र महसूल विभागाच्या सन १९५९ च्या शासन निर्णयान्वये माथेरान या पर्यटन स्थळासाठी विहित नियमावली नुसार माथेरान येथे मोटारगाडी, सायकल, तीनचाकी गाडी इत्यादी कोणत्याही प्रकारची वाहने वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तद्नंतर केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ०४/०२/२००३ च्या अधिसूचनेन्वये माथेरानचा पर्यावरणीयदृष्टया संवेदनशील क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आला असून रुग्णवाहिका तसेच अग्निशमनदलाच्या वाहन तसेच घनकचरा वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनास माथेरान नगर परिषदेच्या हद्दीत मज्जाव करण्यात आला आहे.

माथेरान येथे ई-रिक्षा/सीएनजी रिक्षा किंवा बॅटरीवर चालणारी रिक्षा याने वाहतूक करण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कोकण यांचेमार्फत शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, सदर प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाच्या दिनांक ०४/०२/२००३ च्या अधिसुचनेन्वये गठीत संनियंत्रण समितीच्या अभिप्रायासह शासनास फेरसादर करण्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांना सूचित करण्यात आले आहे.

---

**सताळा (ता.उदगीर, जि.लातूर) येथील शेतकऱ्यांना जमिनीचे विभाजन करून देण्याबाबत**

**(४) १९७८८ (१६-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सताळा (ता.उदगीर, जि.लातूर) येथील शेतकऱ्यांना जमिनीचे विभाजन करून देण्याबाबत विहित मुदतीत नोटीसा न देणे, तसेच विहित मुदतीत विभाजनाची सर्व प्रक्रिया पुर्ण न करणे असे व इतर प्रकार करणाऱ्या तहसिलदार व उपविभागीय अधिकाऱ्याविरूध्द कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, महसूल यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलंब अधिनियम २००५ च्या नियमाप्रमाणे प्रधान सचिव, महसूल यांनी विहित मुदतीत संबंधित तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्यावर कोणतीही सक्षम कारवाई न करता दोषींना पाठीशी घालण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व प्रधान सचिव, महसूल यांची चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१७) :** (१), (२) व (३) तहसिलदार, उदगीर, जि. लातूर यांनी सदर प्रकरणात दिनांक १६/०५/२०१६ रोजी झालेल्या सुनावणीत दिनांक अर्जदार व सहधारकांमध्ये सहमती झाली नसल्यामुळे प्रकरणांत शेतजमीन विभाजनासंदर्भात सक्षम न्यायालयात आपले हक्क सिध्द करून घ्यावेत, असे निर्देश देवून दिनांक २०/०५/२०१६ च्या आदेशान्वये प्रकरण निकाली काढले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरा बाहेरील वळण (बाय-पास) रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(५) १९८६८ (१६-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** तारांकित प्रश्न क्रमांक ११७६६ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहराबाहेरील वळण रस्त्याच्या कामाबाबत जमीन मोजणी, जमीन संपादन व निधी उपलब्धता याबाबत शासनाकडून विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१७) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

परभणी वळणरस्त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार विहीत मुदतीत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने भूसंपादनाची प्रक्रिया नव्याने सुरु करणे क्रमप्राप्त झाले.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी मोजणीच्या कामात दिरंगाई झाल्याबाबत अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ,औरंगाबाद यांचेकडून अहवाल मागविला असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सद्यस्थितीत संयुक्त मोजणीच्या कार्यवाहीनुसार अधिसूचना ३ (A) चे सुधारीत प्रारुप रस्ते वाहतूक मंत्रालयाला प्रसिध्दीसाठी सादर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाच ज्योर्तिलिंगाचे रस्ते महामार्ग म्हणून घोषित करण्याबाबत

**(६) २०८३८ (१९-०८-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाच ज्योर्तिलिंगाच्या दर्शनासाठी होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता ज्योर्तिलिंग देवस्थानांना जोडणाऱ्या रस्त्याच्या वर्गवारीत बदल करुन पाच ज्योर्तिलिंगाचे रस्ते महामार्ग म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाकडे पाठविल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १) सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांनी दिनांक ०३/०१/२०१७ रोजी भारतीय राजपत्रात अधिसुचनानुसार परळी वैजनाथ व औंढा नागनाथ हे दोन ज्योर्तिलिंग असलेले मार्ग नविन राष्ट्रीय राजमार्ग म्हणून खालीलप्रमाणे समाविष्ट केले आहे.

अ) परळी वैजनाथ- i) ३६१ एच परळी वैजनाथ जवळ जोडरस्ता (राष्ट्रीय राजमार्ग ७५२ एम) धर्मापूरी-पानगांव रेणापूर फाटा ii) क्र.५४८ बी देवगांव- फाटा - सेलू-पाथरी-सोनपेठ-परळी(वैजनाथ) अंबाजोगाई-रेणापूर फाटा -लातूर (राष्ट्रीय राजमार्ग ३६१) औसा उमरगा - येनेगुर-मुरुम-आलूर-अक्कलकोट-नागासूर ते विजापूर जवळ (राष्ट्रीय राजमार्ग-५२)

ब) औंढा नागनाथ - ७५२ आय- कोपरगांवजवळ (राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी) ते वैजापूर-लासूर

२) भीमाशंकर हे ज्योर्तिलींग जोडरस्ता असलेला राजगुरु ते भीमाशंकर हा मार्ग तत्वत: राष्ट्रीय महामार्ग म्हणून मंजूर आहे.

३) त्र्यंबकेश्वर हे ज्योर्तिलींग सिन्नर-घोटी-त्र्यंबक-मोखाडा-जव्हार-मनोर-पालघर या राज्यमार्गावर असून सदर राज्य मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: मंजूर आहे.

४) घृष्णेश्वर हे ज्योतिर्लिंग सोलापूर औरंगाबाद धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ वरील औरंगाबाद ते वेरुळ या मार्गावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षण अधिकाऱ्यांच्या समायोजनाबाबत**

**(७) २२००० (२४-०८-२०१६). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचा दर्जा सुधारण्याकरीता व आधुनिकीकरण करण्यासाठी “सेंटर ऑफ एक्सेलन्स योजना” दिनांक २४ ऑगस्ट, २००६ व दिनांक १२ एप्रिल, २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार उक्त योजना बंद करुन सदर योजनेचे सी.टी.एस. योजनेमध्ये रुपांतर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत प्रशिक्षण अधिकाऱ्यांची किती पदे व कोणत्या वेतनश्रेणीत निर्माण करण्यात आली होती तसेच कार्यरत असलेल्या सुमारे ८५ प्रशिक्षण अधिकाऱ्यांचे कोणत्या ठिकाणी व कोणत्या वेतनश्रेणीवर समायोजन करण्यात आले आहे आणि कार्यरत कर्मचाऱ्यांचे समायोजन न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली व प्राप्त निवेदनास लोकप्रतिनिधींना केव्हा उत्तर पाठविण्यात आले आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर योजनेंतर्गत प्रशिक्षण अधिकाऱ्यांची एकूण १५० पदे रुपये ६५००-१०५०० या वेतनश्रेणीत निर्माण करण्यात आलेली होती. सदर निर्माण केलेल्या १५० पदांपैकी ८१ पदांवर प्रशिक्षण अधिकारी कार्यरत होते. त्यापैकी ६८ पदांवरील प्रशिक्षण अधिकाऱ्यांचे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक, प्रगत व्यवसाय प्रशिक्षण योजनेमध्ये प्रशिक्षण अधिकारी, शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये सहाय्यक अभियांत्रिकी अधिक्षक तसेच मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रामध्ये कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार या समकक्ष वेतनश्रेणीतील पदांवर तसेच ८ प्रशिक्षण अधिकाऱ्यांची समकक्ष पदे उपलब्ध नसल्याने, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिल्प निदेशक या पदावर समायोजन करण्यात आलेले आहे. उर्वरित ५ प्रशिक्षण अधिकाऱ्यापैकी ३ प्रशिक्षण अधिकारी यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वर्ग २ च्या पदावर निवड झाली असून सदर पदावर त रुजू झालेले आहेत. तसेच उर्वरित २ प्रशिक्षण अधिकाऱ्यांपैकी  एक प्रशिक्षण अधिकारी हे दिनांक ११/१०/२०१० पासून गैरहजर असून, त्यांचे रुजू करुन घेणेबाबत प्रकरण मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे. तसेच, दुसरे प्रशिक्षण अधिकारी दिनांक १/११/२०१० पासून सतत गैरहजर असून, त्यांनी दिनांक ३०/०९/२०११ पासून त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्याचे संस्थेस कळविले आहे. त्यामुळे त्यांचे समायोजन करण्यात आलेले नाही.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

प्रशिक्षण अधिकाऱ्यांचे समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात आली असून तद्संबंधीचे कार्यालयीन आदेश दिनांक ९/१२/२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले त्यावेळी समायोजनाची कार्यवाही झालेली नसल्याने निवेदनाबाबत उत्तर कळविता आले नाही.

---

**हिंगोली नगरपरिषदेकरीता दत्तमत मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी बीडीएस अभावी व्यपगत झालेला मंजूर निधी संबंधित नगरपरिषदेला प्रत्यार्थित करण्याबाबत**

**(८) २२२४६ (२४-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली नगरपरिषदेसाठी सन २०१४-१५ करीता दत्तमत मंजूर करण्यात आलेल्या निधीपैंकी बीडीएस अभावी व्यपगत झालेला मंजूर निधी संबंधित नगरपरिषदेला

प्रत्यार्थित करण्याबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास राज्यमंत्री, प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमनुरी व जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या निदर्शनास लोकप्रतिनिधी, कळमनुरी, सेवाभावी संस्था, संबंधित नगरपरिषदेतील विविध पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल-मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी नगरपरिषदला मिळण्याबाबतच्या कालावधीत वाढ करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) सन २०१४-२०१५ करीता मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी बी.डी.एस. अभावी निधी व्यपगत झालेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील एआरटी (अँन्टी रेट्रोव्हायरल थेरपी) औषध एच.आय.व्ही. व एडसग्रस्त रुग्णांना नि:शुल्क देण्याबाबत**

**(९) २२३२२ (१९-०८-२०१६). प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील एआरटी (अँन्टी रेट्रोव्हायरल थेरपी) औषध रुग्णांना नि:शुल्क मिळत नसल्यामुळे एच.आय.व्ही. व एडसग्रस्त रुग्णांचे आयुष्य धोक्यात येत असल्याचे दिनांक १४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

औषध तुटवड्या दरम्यान औषधाचा खंड न होण्यासाठी बाहेरुन औषध विकत घेण्यास नॅकोच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे सांगण्यात आले होते. तसेच रुग्णांनी बाहेरुन खरेदी केलेल्या औषधांच्या रक्कमेची प्रतिपूर्ती ही एआरटी केंद्राकडून देयके सादर झाल्यास करण्यात येणार आहे.

सदर औषध तुटवडा हा राष्ट्रीयस्तरावरुन अनियमित औषध पुरवठ्यामुळे झाला होता, जो नॅकोकडून औषध पुरवठा झाल्यानंतर माहे जून, २०१६ अखेरिस सुरळीत व नियमित झाला आहे.

(२) राज्यात माहे मे, २०१६ च्या पंधरवड्यात TLE व ZL ARV औषधांचा तुटवडा झाला होता. नागपूर जिल्हयांत सदर दोन औषधांपैकी TLE औषधांचा तुटवडा जास्त प्रमाणात होता. या संदर्भात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (मराएनिंस) कडून नियमितपणे पत्रव्यवहार/ ईमेल/ दूरध्वनी करुन तुटवड्यातील औषधी नॅको नवी दिल्ली व इतर राज्यांकडून उपलब्ध करुन घेण्यासाठी पाठपुरावा केला होता. तसेच मराएनिंस कार्यालयातून दर आठवड्याला राज्यातील व एआरटी केंद्रांतील उपलब्ध औषध साठ्यांचे अहवाल तयार करुन नॅको नवी दिल्ली यांना पूरक साठा देण्याबाबत सूचित केले होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भालिवली (ता. वसई, जि. पालघर) येथील आदिवासींच्या जमिनीबाबत झालेल्या अन्यायाबाबत**

**(१०) २२५६५ (१६-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भालिवली (ता.वसई, जि.पालघर) येथील कु.निलेश बुधू कारेला तसेच आकाश बुधू कारेला या दोघांचे वय १५ ते १३ असताना रजिस्टर दस्तावर सज्ञान ३८ वर्ष दाखवून ७/१२ वर कब्जेदार अज्ञान मुले असताना मुलांच्या हिश्याचे सर्व नियमांचे उल्लघंन करून सदर आदिवासींच्या जमिनीबाबत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री, प्रधान सचिव (महसूल), विभागीय आयुक्त (कोकण भवन, मुंबई) यांच्याकडे दिनांक ७ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरफार क्र. ३४० दिनांक १ जुलै, २०१३ तसेच फेरफार क्र. ३७३ नुसार दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी जमिनीत फेरबदल व वाटणीपत्र करुन अज्ञान मुलांची खातेफोड करून फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरची जागा शेती प्रयोजनार्थ असताना आदिवासींच्या जमिनीवर पूर्णत: बांधकामास परवानगी देणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०६-२०१७) :** (१) श्रमजिवी संघटनेचे संस्थापक तथा जिल्हाध्यक्ष पालघर यांचे या आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) मौजे भालिवली, ता.वसई जि.पालघर येथील स.नं.२४/१, २५ व २६/१ ही मिळकत मूळ पुरुष दुंदा मुकुंद कारेला यांचे नावे कुळ कायद्यान्वये दाखल होती. त्यांचे मृत्यूनंतर फेरफार क्र.१८२ दिनांक २२/८/१९८८ अन्वये वारस बुधु दुंद्या कारेला, काशिनाथ दुंद्या कारेला, माधव दुंद्या कारेला, शंभू दुंद्या कारेला, भाई लडकू कारेला यांची नावे दाखल झालेली आहेत. उक्त जमीन फेरफार क्र. ३४०, दिनांक ०१/०७/२०१३ अन्वये हक्कसोडपत्रान्वये श्री.काथोड काशिनाथ कारेला यांचे नावे दाखल झालेली आहे. सदर हक्कसोडपत्रकाचे अवलोकन केले असता श्री.निलेश बुधु कारेला व आका बुधु कारेला यांचे वतीने अ.पा.क. म्हणून काथोड काशिनाथ कारेला यांनी स्वाक्षरी केलेली आहे. तद्नंतर काथोड कारेला आणि कु.निलेश व आका बुधु कारेला यांच्यात प्रस्तुत जमिनीसंदर्भात सह.दुय्यम निबंधक वसई ६, वर्ग-२ दिनांक ११/०८/२०१५ अन्वये नोंदणीकृत वाटप झाले असून स.नं. २५ चे क्षेत्र ०-७७.३९ हे.आर क्षेत्र अज्ञान मुलांच्या नावे फेरफार क्र. ३७३ दिनांक ०६/११/२०१५ अन्वये दाखल आहे.

(३) प्रस्तुत जागेवर कोणतीही बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

### औरंगाबाद-अंजिठा या राज्यमार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

**(११) २२६८३ (१६-०८-२०१६). श्री.विक्रम काळे :** तारांकित प्रश्न क्रमांक १५७४८ ला दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद या ऐतिहासिक शहरापासून अंजिठा या पर्यटन स्थळाला जोडणाऱ्या राज्यमार्गाच्या चौपदरीकरणाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१७) :** (१) नव्याने घोषित राष्ट्रीय महामार्ग ७५३ फ च्या औरंगाबाद-सिलोड-फर्दापूर हया १०० कि.मी. रस्त्याचे पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण व प्रमुख गावांमध्ये चौपदरीकरणाच्या कामासाठी दोन पॅकेजमध्ये कंत्राटदारासोबत करारनामा झाला असून मे, २०१९ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हया लांबीमध्ये औरंगाबाद-अजिंठा हया महामार्गाचा समावेश आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मो.ह. विद्यालय (ठाणे) शासनाने घोषित केलेला विशेष पुरस्कार निधी न मिळाल्याबाबत

**(१२) २४४४५ (१६-१२-२०१६). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र्यपूर्वकालीन असलेल्या आणि शासनाचे सर्व निकष पाळणाऱ्या महाराष्ट्रातील १०० शाळांना विशेष पुरस्कार म्हणून प्रत्येकी १० लाख रुपयांचा निधी देण्याचे सन २०१३ मध्ये तत्कालीन शासनाने जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या १०० शाळांमध्ये ठाण्यातील मो.ह. विद्यालयाचा समावेश असूनही या शाळेला शासनाने जाहीर केलेला विशेष पुरस्कार निधी प्राप्त झाला नसल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने घोषित करुनही मो.ह.विद्यालयासह राज्यातील अन्य शाळांना विशेष पुरस्कार निधी देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२५-०७-२०१७) :** (१) व (२) होय.

(३) व (४) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

---

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य केल्याबाबत

**(१३) २४७०१ (१६-१२-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ११ वी व १२ वीत शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शासनाने चालू वर्षापासून जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य केल्यामुळे अनेक विद्यार्थी चालूवर्षी शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थी हे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात राहत असणे, जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब लागत असणे अशा अनेक अडचणी येत असल्याने ही अट रद्द करण्याची मागणी संबंधित विद्यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०७-२०१७) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मद्यपान करून एस.टी. चालविणाऱ्या वाहनचालकावर कारवाई करण्याबाबत**

**(१४) २४७३८ (३०-१२-२०१६). आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर शिवनेरी बस चालक मद्यपान करून वाहन चालवित असून प्रवाशांचा जीव धोक्यात आणण्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या एस.टी. चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०७-२०१७) :** (१) व (२) माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये अशा प्रकारची घटना घडलेली नाही. परंतू दिनांक ११/०८/२०१६ रोजी परळ आगाराची अश्वमेघ व्होल्वो बस क्र. एमएच ११ टी ९२४३ ही दादर-पुणे मार्गावर धावत असताना, उर्से टोल नाका येथे आली असता, सदर कर्तव्यावरील चालक श्री. रामदास कृष्णा मेश्राम हे मद्यपान करुन वाहन चालवित असल्याचे निदर्शनास आले. सदर प्रकरणी चालकास दिनांक १३/०८/२०१६ पासून निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नगरपरिषदांमधील “क” संवर्गातील मंजूर रिक्त पदे भरणेबाबत**

**(१५) २५७९७ (०४-०१-२०१७). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदेच्या मंजूर “क” संवर्ग अधिनियम व मंजूर आकृतीबंधाप्रमाणे लेखापरिक्षण लेखा सेवा अंतर्गत अनेक रिक्त पदे असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक नगरपरिषदेला कोटयवधी रुपयांचा निधीचे वाटप झालेले असतांनाही रिक्त पदे न भरता अपात्र कर्मचा-यांकडून काम करुन घेण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर मंजूर पदे भरण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१७) :** (१) होय.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी-ब चे नियुक्ती प्राधिकारी हे विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक व श्रेणी-क चे नियुक्ती प्राधिकारी हे जिल्हाधिकारी असल्याने संचालनालयाने दिनांक २२/०२/२०१६ च्या परिपत्रकान्वये जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त तथा सर्व प्रादेशिक संचालक यांना रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्याविषयी कळविले होते.

नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७/०३/२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांना घोषित करण्यात आले आहे. तसेच, संवर्गातील १४८३ रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे, बिंदुनामावली प्रमाणित करणे, पदोन्नतीची कार्यवाही करणे ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर सरळसेवेने पदे भरण्याची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) वरीलप्रमाणे.

---

## राज्यात रस्ते बांधणीच्या योजनेबाबत

**(१६) २६७४४ (१३-०४-२०१७). श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रस्ते बांधणीसाठी रूपये दोन लाख कोटी खर्चाची योजना कैंद्रीय परिवहन मंत्रालयाकडून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेकरीता शासनाकडून भूसंपादनाची कार्यवाही करण्याचे काम सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेच स्वरुप काय आहे तसेच, कोणत्या विभागातील कोण-कोणत्या रस्त्यांचे प्रस्ताव विचारात घेऊन रस्ते बांधणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०६-२०१७) :** (१) केंद्रीय परिवहन मंत्रालयाकडून महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गाच्या सुमारे रु.७७,००० कोटी इतक्या रक्कमेची कामे विविध योजनेमधून नियोजित/प्रस्तावित केली असून सदर कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, राज्य शासनाचे राष्ट्रीय महामार्ग विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत करण्यात येत आहे.
(२) व (३) राज्यातील एकूण राष्ट्रीय महामार्गापैकी प्रामुख्याने पुणे सातारा कागल [रा.म.मा.४८ (जुना ४)] अमरावती ते गुजरात हद्द [रा.म.मा.५३ (जुना ६)], बुटीबोरी ते तुळजापुर (रा.म.मा.३६१), धुळे-औरंगाबाद सोलापूर [रा.म.मा.५२ (जुना-२११)], पुणे-नाशिक (रा.म.मा.६०), रत्नागिरी-सोलापूर (रा.म.मा.१६६), पनवेल-इंदापूर-झाराप [रा.म.मा.६६(जुना१७)], कल्याण-निर्मल [रा.म.मा.६१(जुना-२२२)] हया राष्ट्रीय महामार्गांचे चौपदरीकरण/सहापदरीकरणासाठी भूसंपादन तसेच प्रकल्पाबाबत कार्यवाही विविध टप्प्यावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अनुसूचित जाती-जमातीसाठी विशेष न्यायालय स्थापन करणेबाबत

**(१७) २६७५६ (१२-०४-२०१७). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.संजय दत्त, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती-जमातीतील प्रवर्गासाठी शासनाने विशेष न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेऊनही ॲट्रॉसिटीसंदर्भात न्यायालये स्थापन करण्यात आली नसल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने शासनाला चार आठवडयात प्रतिज्ञा पत्र दाखल करण्याचे आदेशही दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सध्या मुंबई (ठाणे), औरंगाबाद व नागपूर येथे विशेष न्यायालये सुरु करण्यात आली असून उर्वरित नाशिक, पुणे व अमरावती येथे न्यायालये कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर सद्यःस्थितीच्या अनुषंगाने मा. न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रकल्पग्रस्त मच्छिमारांच्या मागण्यांबाबत**

**(१८) २६९२३ (१३-०४-२०१७). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र तसेच राज्य शासनाकडून अनेक सागरी प्रकल्प राबविले जात असताना मच्छिमारांसोबत कोणतीही चर्चा न करता प्रकल्पबाधितांना नुकसान भरपाई, मच्छिमार तरुणांना नोकऱ्या, प्रकल्पावर त्यांच्या बोटींना ठेके, शासकीय नोकरीत प्रकल्पबाधित म्हणून आरक्षण इत्यादीपासून मच्छिमार कोळी बांधव वंचित राहिल्याने मच्छिमारांनी मुंबईत एकता बाईक मूक रॅली काढल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०३-०७-२०१७) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

दिनांक २२/२/२०१७ रोजी रॅली काढण्यात आली आहे.

(२) नवीन प्रकल्पासंदर्भात मच्छीमारांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरात बेदरकारपणे मोटारसायकल चालवणा-या तरूणांच्या टोळक्यांवर कारवाई करणेबाबत**

**(१९) २७०७२ (१३-०४-२०१७). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे-बॅण्ड स्टॅण्ड, वरळी सी-फेस, हाजी अली सर्कल आणि मरीन ड्राईव्हपासून ते ठाण्याच्या उपवन पर्यंत वेडीवाकडी मोटारसायकल चालवून रोरावत जाणा-या बेदरकार तरूणांच्या टोळक्यांचा सुळसुळाट मोठया प्रमाणात वाढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अशा मोटारसायकल रेसरना रोखण्याकरिता कोणत्या विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या मोटारसायकल रेसर तरुणांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१७) :** (१) मरिन ड्राईव्ह, हाजी अली सर्कल(पेडर रोड) याठिकाणी रेसींगचे आयोजन करत असल्याबाबत कोठेही निदर्शनास आलेले नाही व वरळी सी लिंक वर दुचाकी वाहनास निर्बंध आहे.

तसेच बांद्रा वरळी सी-लिंक व यु ब्रिज रेक्लेमेशन बांद्रा पश्चिम मुंबई या मार्गावर बाईक रेसींगच्या घटना घडू नये, याकरीता कारवाईचे आयोजन केले जात असते.

(२) सदरहू प्रकरणी वरिष्ठांच्या आदेशाने विशेष कारवाई पथक नेमण्यात आले असून वाहन चालकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता मुंबईतील एकूण ७ जंक्शन / मार्गावर एकूण ३६ ठिकाणी Automatic Number Plate Recognition Camera (Infraed) with PTZ and Zoom /Focus बसविण्याकरीता म.न.पा. विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकरणी कसुरदार वाहन चालकांवर मो.वा.का. कलम १८४ अन्वये कारवाई करण्यात येते.

(३) याप्रकरणी मो.वा.का. कलम १८४ अन्वये सन २०१६ ते २०१७ पर्यंत २२७११ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील मच्छीमारांना राज्याबाहेरील जलधीक्षेत्रात मासेमारी करण्यासाठी परवानगी देण्याबाबत**

**(२०) २७२०५ (१३-०४-२०१७). श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, अॅड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.जगन्नाथ शिंदे** : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमारांनी राज्याबाहेरील जलधीक्षेत्रात मासेमारी करण्याची परवानगी सहाय्यक मत्स्यव्यवसायविभाग यांचेकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०३-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्याला या राज्याच्या जलधी क्षेत्राबाहेर विशाल आर्थिक क्षेत्रात मासेमारी करण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पशुवैद्यकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या बदली, नियुक्ती व प्रतिनियुक्तीबाबत**

**(२१) २७२९७ (१३-०४-२०१७). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या प.दु.म. विभागामध्ये दिनांक ३१ जुलै, २०१६ पर्यत ५३७ अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून ३० पशुवैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर गेलेले आहेत तर अनेक अधिकारी एकाच विभागात १० वर्षाचा कालावधी होऊनही कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अन्वये उपरोक्त विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या बदली, नियुक्ती, प्रतिनियुक्तीबाबतीत काटेकोरपणे पालन केले असे दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विभागातील एकुण किती अधिकारी व कर्मचारी यांची बदली, नियुक्ती, प्रतिनियुक्ती कोणत्या प्रकारे केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०६-२०१७) :** (१), (२) व (३) पशुसंवर्धन विभागात जुलै, २०१६ अखेर पशुधन विकास अधिकारी या संवर्गात ४ अधिकारी उसनवारी तत्वावर, १२ अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत होते. तसेच १२ अधिकारी हे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे कार्यरत होते. त्याच प्रमाणे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील २ अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत होते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील पदे ही जरी ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील पदे असली तरी तेथे पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी/सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे सदर पदे हि प्रतिनियुक्तीची समजता येणार नाही. अशा प्रकारे जुलै, २०१६ अखेर १४ अधिकारी प्रतिनियुक्तीने, १२ अधिकारी जिल्हा ग्राम विकास यंत्रणेवर व ४ अधिकारी उसनवारी तत्वावर कार्यरत होते.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मंजूरीने पशुसंवर्धन विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत कार्यवाही करण्यात येते.

सद्य:स्थितीत शासन निर्णय साप्रवि दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदी विचारात घेवून पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या इतर विभागात प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभागाचा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर १ सहाय्यक आयुक्त व ३ पशुधन विकास अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बिगर आदिवासी भागातील वर्ग तुकड्यांना अनुदान देवून सदर तुकड्यांची ऑनलाईन मुल्यांकन प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(२२) २७३६१ (१२-०४-२०१७). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बिगर आदिवासी भागातील ५७१८ तुकड्या व आदिवासी भागामधील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी संख्या वाढीने मिळालेल्या २५५ तुकड्यांना विना अनुदानित तत्वावर शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ च्या शासन आदेशाने मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वर्ग तुकड्यांना दिनांक ११ ऑक्टोबर, २००० च्या निर्णयानुसार पाच वर्षांनी अनुदानास आवश्यक असणारी कार्यपद्धती अवलंबणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या वर्ग तुकड्यांना अनुदान देवून सदर तुकड्यांची ऑनलाईन मुल्यांकन प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सन २००१ पासून विनाअनुदानित शाळा/तुकडया देण्याचे धोरण संपूष्टात आलेले आहे. त्यामुळे अनुदान देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता**
**मुंबई शहरात स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत**

**(२३) २७३८८ (१५-०६-२०१७). ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता मुंबई मध्ये तयार इमारत किंवा शासकीय जागा उपलब्ध करुन घेऊन त्याठिकाणी स्वतंत्र इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार स्वतंत्र इमारत वा जागेचा शोध घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत गतवर्षी अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे
**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मलोआ १११६/प्र.क्र.८७/ आठ दिनांक ७ जुलै, २०१६ अन्वये प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली.

(३) सदर समितीने दिनांक ३ मार्च, २०१७ रोजी शासनास अहवाल सादर केला असून समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने जागा उपलब्धतेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील जगप्रसिध्द फॉक्सकॉन कंपनीने गुंतवणूक करण्याची तयारी दाखविल्याबाबत**

**(२४) २७४३२ (१५-०४-२०१७). श्री.नारायण राणे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील जगप्रसिध्द फॉक्सकॉन कंपनीने सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची तयारी दाखविली असल्याची माहिती मा.मुख्यमंत्री यांनी जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीला राज्यात गुंतवणूक करण्यासाठी केंद्र शासनाकडून आर्थिक सवलती अपेक्षित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीला केंद्र शासनाकडून सवलती मिळवून देण्यासाठी राज्य शासन पाठपुरावा करणार आहे काय, तसेच राज्यात उक्त कंपनीने गुंतवणूक करुन राज्यातील रोजगार निर्मिती करावी यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे,

(४) असल्यास, मेक इन महाराष्ट्र कार्यक्रमादरम्यान उक्त उद्योजकाने सादर केलेल्या गुंतवणूक प्रस्तावाप्रमाणे प्रकल्प सुरु करण्याची अपेक्षित तारीख काय होती ?

**श्री. सुभाष देसाई (१४-०७-२०१७) :** (१) मे. फॉक्सकॉन या कंपनीने राज्यात सुमारे रुपये ३०००० कोटी गुंतवणूक व ५० हजार व्यक्तींना रोजगाराच्या संधी प्रस्तावित केल्या आहेत.

(२) सदरहू बाब ही केंद्र शासनाशी निगडीत आहे.

(३) व (४) मे. फॉक्सकॉन कंपनीचे प्रतिनिधीचे शिष्टमंडळ नुकतेच जानेवारी, २०१७ मध्ये राज्यात भेटीसाठी येवून गेले आहेत. घटकामार्फत राज्यात उद्योगस्थापनेकरिता सुनियोजित ठिकाण व प्रोत्साहने याबाबत राज्य शासनस्तरावर चर्चा चालू आहे प्रस्तूत विषयी चर्चेअंती सकारात्मक प्रतिसादाबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. देशांतर्गत सर्व राज्यांनी “व्यवसाय करणे सोपे” Ease of Doing Business च्या माध्यमातून मोठया प्रमाणावर सुधारणा केल्या आहेत. परिणाम सर्व राज्य उद्योग आकर्षित करण्यासाठी उद्योग समूहांना विविध प्रोत्साहन देवू करत

आहेत. यास्तव राज्यांतर्गत निकोप स्पर्धात्मक वातावरणात एखाद्या उद्योगाने कोणत्या ठिकाणी उद्योग सुरु करावा हा निर्णय सर्वस्वी त्या उद्योजकाचा असल्याने राज्य शासन याबाबत सकारात्मक चर्चा करुन प्रयत्नशिल आहे.

---

**मिरारोड येथील कॉल सेंटर फसवणूक प्रकरणाबाबत**

**(२५) २७४८४ (१३-०४-२०१७). श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मिरारोड येथील सुमारे ५०० कोटी रुपयांच्या कॉल सेंटर फसवणूक प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू प्रकरणी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेने खालील नमुद ठिकाणी छापा टाकुन खालीलप्रमाणे गुन्हे दाखल केले आहे.

१) काशिमीरा पोलीस ठाणे गु.र.क्र. ५९६/२०१६, भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३८४, १२० (ब),४६८, ४७०, ४७१, २०१ सह इंडीयन टेलीग्राफ ॲक्टचे कलम २५ (क), तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा, २००८ चे कलम ६६ (क), ६६(ड), ७२, ७५ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात बनावट कॉल सेंटर चालविण्यासाठी वापरण्यात आलेल्या संगणकामधील हार्ड डिस्क, सर्वर, मॅजिक जॅक, डीव्हीआर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक्स उपरकरणे, कागदपत्रे जप्त करण्यात येऊन एकुण १७८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

२) नयानगर पोलीस ठाणे गु.र.क्र.३३४/२०१६ भा.दं.वि.कलम ४१९, ४२०, ३८४, ३४, १२० (ब) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (ब), ६६(क), ७२(१), ७५ प्रमाणे सदर गुन्हयात हार्ड डिस्क, सर्वर, मॅजिक जॅक, डीव्हीआर, मोबाईल फोन, कागदपत्रे जप्त करण्यात येऊन करण्यात येऊन एकुण १० आरोपींना अटक करण्यात आली आहे.

३) नयानगर पोलीस ठाणे गु.र.क्र.३३५/२०१६ भा.दं.वि.कलम ४१९, ४२०, ३८४, ४६८, ४७०, ४७१ व १२० (ब) सह माहिती तंत्रज्ञान कायदा, २००८ चे कलम ६६ (क), ६६(ड), ७२ व ७५ सह द इंडीयन टेलीग्राफ ॲक्ट कलम २५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात हार्ड डिस्क, सर्वर, डीव्हीआर, मोबाईल फोन, रोख रक्कम सी.पी.यु. पेन ड्राईव्ह, इतर कागदपत्रे जप्त करण्यात येऊन एकुण १०७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

वरील तिन्ही गुन्हे मा.न्यायालयाच्या आदेशान्वये सी.आर.पी.सी. कलम १७३(८) प्रमाणे तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत**

**(२६) २७५९४ (१३-०४-२०१७). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागरी भागातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यासाठी शासनाने धोरण तयार करून सदर धोरण मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर मा.उच्च न्यायालयात दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजीच्या आदेशान्वये शासनाने तयार केलेल्या अनधिकृत इमारती नियमित करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास अनुमती नाकारली असून शासनाच्यावतीने नवीन धोरण सादर करण्यास मुभा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने नवीन धोरण सादर करण्यास दिलेल्या अनुमतीस अनुसरून नवीन धोरण ठरविण्याबाबतची शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत धोरणाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१७) :** (१), (२), (३) व (४) शासनाने नागरी क्षेत्रासाठी अनधिकृत बांधकामे नियमित करणे, त्यावर कारवाई करणे यावर उपाययोजना सुचविण्यासाठी नियुक्ती केलेल्या आयुक्त, बृहन्मुंबई मनपा यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी नुसार धोरण ठरवून त्या धोरणास दिनांक १० मार्च, २०१६ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झालेली होती. तथापि, अनधिकृत बांधकामासंबंधी मा.उच्च न्यायालयामध्ये विविध जनहीत याचिका दाखल झालेल्या असल्याने शासनाने मा. मंत्रीमंडळाने मान्य केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाची अनुमती अपेक्षिलेली होती. तथापि, मा. उच्च न्यायालयाने दिनांक २६/०४/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्यास अनुमती दिलेली नाही.

राज्य शासनाने दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंतच्या बेकायदा बांधकामांना संरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये योग्य ते बदल करण्यासाठी महाराष्ट्र ॲक्ट क्र.XXXII OF २०१७ पारित केलेला असून तो दिनांक १५/०४/२०१७ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम ५२ अे (१) नुसार याबाबतचे नियम तयार करणेत आलेले असून सदर प्रारुप नियम उक्त अधिनियमाच्या कलम-१५८(१) अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी दिनांक २१/०७/२०१७ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेने एकाच प्रयोजनाकरिता निधी खर्च केल्याबाबत**

**(२७) २७८५० (१७-०४-२०१७). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सन २०१२ ते २०१४ या कालावधीत १३ व्या वित्त आयोगाचा व सन २०१५-१६ ह्या कालावधीत १४ व्या वित्त आयोगाचा निधी प्राप्त झाला असून एकूण मिळुन रुपये १२५ कोटी इतका निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला शासनाच्या नगरविकास विभागातर्फे शासन निर्णय ते.वी.आ-२०१०/प्र.क्र. १३१/न.वी.४ दिनांक २५/१०/२०१० चे उल्लंघन उपरोक्त प्रकरणी महानगरपालिकेचा लेखा विभाग व तत्कालीन आयुक्त तसेच कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व जलनिसारण विभाग यांचेकडुन होत असून मनमानी स्वरुपात एकाच प्रयोजनावर उपरोक्त रक्कम खर्च केल्याप्रकरणी दोषी व्यक्तींची चौकशी व कारवाई करण्याची मागणी दिनांक १३ जून, २००६ रोजी श्री.मिलन म्हात्रे यांनी नगरविकास विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले, उक्त चौकशीच्या अनुषंगाने नागरिकाची फसवणूक करणारे तत्कालीन आयुक्त तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा तसेच मलनिसारण विभाग यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) अशी बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेने काळया यादीत टाकलेल्या कंपनीस काम दिल्याबाबत**
**(२८) २७८५८ (१७-०४-२०१७). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे प्रकल्प सल्लागार मे. टंडन अर्बन सोलुशन यांना मा.मुंबई उच्च न्यायालयाने महानगरपालिकेच्या संबंधित निविदा प्रकरणात दोषी ठरवुन काळया यादीत टाकणे तसेच पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्यावर संबंधित प्रकरणी दावे दाखल करावेत असे आदेश दोन वर्षापुर्वी देऊनही त्यांना महानगरपालिका आजही सल्लागाराची कामे देत असुन त्याची देयके सुध्दा अदा करायचे काम करीत असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या एम.एम.आर.ए. किंवा एम. एम. आर.डी.ए. या प्रकल्पावर मे. टंडन अर्बन सोलुशनही कंपनी सल्लागार किंवा अन्य कामे करीत आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. या कंपनीचे प्रतिनिधी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या कंपनीस काळ्या यादीत टाकण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.
सद्य:स्थितीत मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. या कंपनीस महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारचे काम देण्यात आलेले नाही.
(२) मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. ही कंपनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अभियांत्रिकी विभागामध्ये सद्य:स्थितीत काम करत नाही.
(३) मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. या कंपनीचे प्रतिनिधी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर कंपनीस काळ्या यादीत टाकण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथे मा.उच्च न्यायालय, मुंबईचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करण्याबाबत

**(२९) २८००० (१७-०४-२०१७). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिकसह विविध भागातून मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करणेबाबत सातत्याने मागणी होत असल्याने या मागणीचे अनुषंगाने मा.मुख्य न्यायमुर्तीनी मुंबई उच्च न्यायालयातील तीन न्यायमुर्तींची समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त मागणीचे अनुषंगाने राज्यात मा.उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करणेबाबत गठीत समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, अहवालावरील शिफारशीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कोल्हापुर व पुणे येथे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार व्हावा अशी शिफारस शासनाने मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नविन खंडपीठ स्थापनेबाबत केंद्र शासन नियुक्त जसवंतसिंग समितीने अहवालातून विहीत केलेल्या निकषानुसार नाशिक येथे सततच्या मागणीचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाचे स्वतंत्र खंडपीठ वा सर्किट बेंच स्थापनेबाबत विचार होवू शकतो किंवा कसे याबाबींची शासनाकडून पडताळणी करण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) होय.

(५) जसवंतसिंग समितीने उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापनेसंबंधी स्पष्ट केलेल्या निकषांच्या आधारे कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे एक फिरते खंडपीठ स्थापन करण्याची शिफारस शासनाने मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील इतर मागासवर्गीय समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याबाबत**

**(३०) २८२३७ (१५-०४-२०१७). श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागासवर्गीय समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राम शिंदे (१३-०७-२०१७) :** (१), (२) व (३) शासन अधिसूचना दिनांक ९ मार्च, २०१७ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग नव्याने निर्माण करण्यात आला आहे.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात (एसटी) भरती प्रक्रियेसंदर्भात**

**(३१) २८६३९ (१३-०४-२०१७). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात (एसटी) मोठी पद भरती करण्यात येणार असल्याचे मा.परिवहन मंत्री यांनी सांगून त्याबाबत सूचना एसटी प्रशासनाला दिल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मा.परिवहन मंत्री यांच्या सूचनेनुसार जाहिरात प्रसिध्द करून पद भरती प्रक्रियेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळात माहे जानेवारी, २०१७ मध्ये १४२५३ पदांची जाहिरात देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-गोवा महामार्गवरील ब्रिटीशकालीन पुलांची दुरूस्ती करण्याबाबत

**(३२) २८९१८ (१३-०४-२०१७). श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा या महामार्गावर एकूण २१ पूल असून त्यापैकी १५ पुल ब्रिटीशकालीन असून उक्त जीर्ण व दुरवस्थेतील पुलांमुळे जिवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पुलांची दुरुस्ती करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर पुलांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या महाराष्ट्र राज्यातील ४७५.०० कि.मी. लांबीमध्ये १८ ब्रिटीशकालीन मोठे पुल असुन त्यापैकी पनवेल ते इंदापूर हया भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून प्रगतीत असलेल्या ८४.०० कि.मी. चौपदरीकरणामध्ये दोन पुलांचे रुंदीकरणाबरोबरच समांतर पुल बांधण्याचे काम समाविष्ट आहे.

तसेच इंदापूर ते झाराप हया ३६६.०० कि.मी. लांबीमधील १६ पुलांपैकी १० ठिकाणी नवीन पर्यायी पुलांची कामे प्रगतीत असून उर्वरीत ६ ठिकाणची कामे चौपदरीकरणात समाविष्ट असुन या प्रकल्पांची निविदा निश्चिती अंतिम टप्प्यात आहे. तसेच अस्तित्वातील पुलांच्या दुरुस्तीसाठी रु.९.०० कोटी किंमतीचे अंदाजपत्रक रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाला सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शिवणगांव येथील प्रकल्पग्रस्ताचे ७८८ भूखंडापैकी १६५ व्यक्तींनी भूखंड नाकारल्याबाबत

**(३३) २८९६९ (१३-०४-२०१७). श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शिवणगांव येथील प्रकल्पग्रस्ताचे ७८८ भूखंडापैकी १६५ भूखंड नाकारल्या गेल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्ताचे भूखंड नाकारण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील समाजकल्याण विभागाने एकाच वर्षातील शिष्यवृत्तीची रक्कम सलग दोन वेळा जमा केल्याबाबत**

**(३४) २९०५९ (१२-०४-२०१७). श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील समाजकल्याण विभागाने भटक्या-विमुक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या खात्यावर एका शैक्षणिक वर्षातील गुणवत्ता शिष्यवृत्तीची रक्कम माहे मार्च, २०१५ व मार्च, २०१६ मध्ये सलग दोन वेळा जमा केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**भंडारा जिल्हयात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुरु करण्याबाबत**

**(३५) २९१०० (१२-०४-२०१७). श्री.परिणय फुके :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भटक्या विमुक्त जातीच्या समाजातील व्यक्तिंसाठी शासनाने यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अंमलात आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा जिल्हयात सदर वसाहत योजनेचे भूमीपुजन न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राम शिंदे (१३-०७-२०१७) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ग्रामीण भागातील आदिवासी आश्रमशाळांना मान्यता देण्याबाबत**

**(३६) २९४२३ (१२-०४-२०१७). श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थी मुख्य प्रवाहात यावे म्हणून आदिवासी विकास आयुक्तालयाच्यावतीने ग्रामीण भागात आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत किती जिल्हयात आश्रमशाळांना मान्यता देण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) आतापर्यंत राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये एकूण ५५२ शासकिय आश्रमशाळांना व २६ जिल्ह्यातील ५५६ अनुदानित आश्रमशाळांना शासनाने मान्यता दिली आहे. मागील दहा वर्षात एकाही नविन आश्रमशाळेला मान्यता दिलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद यांच्या गैरवर्तनाबाबत

**(३७) २९४३७ (१३-०४-२०१७). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बोधनकर, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद हे चारा टंचाईच्या काळात तालुक्याच्या ठिकाणी काम करण्यास सक्षम नसल्याबाबत तसेच कार्यालयात सतत गैरहजर राहत असल्यासंदर्भात सभापती, पंचायत समिती, परंडा यांनी जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी व अन्य संबंधित विभागाकडे दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी व त्यासुमारास तक्रारी करूनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०६-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही,

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, परंडा, जि. उस्मानाबाद यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०२/२०१७ च्या आदेशान्वये त्यांची बदली पशुधन विकास अधिकारी पवैद श्रेणी-१ कासारशिर्शी, ता.निलंगा, जि.लातूर या पदावर करण्यात आली आहे. तसेच संबंधित पशुधन विकास अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही

---

## प्रथम या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या राज्यव्यापी सर्वेक्षणात खाजगी शाळाहून शासकीय शाळा सरस असल्याबाबत

**(३८) २९५७९ (१२-०४-२०१७). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रथम या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या राज्यव्यापी सर्वेक्षणात खाजगी शाळाहून शासकीय शाळा सरस असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालात काही शिफारशी करण्यात आल्या आहेत काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) गुणवत्ता वाढविण्याच्या हेतूने दिनांक २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्यानुसार प्रथम भाषा व गणित या विषयाच्या चाचण्या राज्यस्तरावरुन घेण्यात येतात. ज्या क्षमतामध्ये विद्यार्थ्यांना अडचणी असतील त्यासाठी कृती कार्यक्रम आखून प्रत्येक विद्यार्थी प्रभृत्व पातळीकडे वाटचाल करु शकेल हा या कार्यक्रमाचा हेतु आहे. तसेच गणित विषयाचे शिक्षकांना प्रशिक्षण व शाळांना आवश्यक शैक्षिणिक साहित्य दिले जात आहे. शिक्षकांना ई-साहित्याचा वापर करता यावा, यासाठी “मित्रा ॲप” तयार करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अत्याधुनिक १३ बस पोर्टलची बांधणी करण्याबाबत

**(३९) २९७३२ (१५-०४-२०१७). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३ एस.टी. आगारांचे अत्याधुनिक १३ बस पोर्टलमध्ये बांधणी करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :** (१) होय.

(२) राज्यातील १३ ठिकाणच्या बसस्थानकांचे सार्वजनिक खाजगी सहभागातून आधुनिकीकरणाचा प्रकल्प आखणीसाठी तज्ञ सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर संस्थेमार्फत राज्य परिवहन महामंडळाच्या पनवेल, बोरिवली-नॅन्सी कॉलनी, पुणे-शिवाजी नगर, सोलापूर-पुणे नाका, नाशिक-महामार्ग, औरंगाबाद-मध्यवर्ती, नांदेड-मध्यवर्ती, अकोला, नागपूर-मोरभवन या ९ ठिकाणच्या बस स्थानकांची आखणी करण्यात आली असून, या प्रकल्पासाठी ई-निविदा मागविल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महसूल विभागातील अधिकारी संवर्ग पदांच्या पदोन्नत्या प्रलंबित असल्याबाबत

**(४०) २९९२१ (१५-०४-२०१७). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसूल विभागांतर्गत गत ४-५ वर्षापासून अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्या पदोन्नत्या शासनाने केलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महसूल विभागातील अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे शासकीय कामात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर पदांना पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१७) :** (१), (२) व (३) शासनाच्या दिनांक १६/३/२०१६ च्या व दिनांक ५/७/२०१६ च्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अनुक्रमे ३५ व २३ अधिका-यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

शासनाच्या दिनांक ६/८/२०१४ च्या आदेशान्वये १२ अधिका-यांस व दिनांक २७/६/२०१६ व दिनांक २९/१०/२०१६ च्या आदेशान्वये अनुक्रमे ४० व १ अधिका-यास उप जिल्हाधिकारी संवर्गातून अपर जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे

शासनाच्या दिनांक १६/२/२०१३ व दिनांक १३/२/२०१४ च्या आदेशान्वये अनुक्रमे ५१ व १० अधिका-यांना तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

सन २०१२ मध्ये एकुण ४५, सन २०१३ मध्ये एकुण ११७, सन २०१४ मध्ये एकुण ३३, सन २०१५ मध्ये एकुण २८ व सन २०१६ मध्ये एकुण ५५ अधिका-यांना नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) शहरातील सोनाळे गावातील दुकानदाराचा चोरटयांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याबाबत**

**(४१) ३०१३२ (१३-०४-२०१७). श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील सोनाळे गावच्या कंपाऊंड मधील किराणा मालाच्या दुकानात चोरीच्या उद्देशाने शिरलेल्या चोरांना प्रतिकार केल्याने चोरटयांनी दुकानदारावर चाकूने वार केल्याने दुकानदार मृत झाल्याची घटना दिनांक २६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर चोरटयांना पकडून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन भिवंडी तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१७/२०१७ भादंवि कलम ३०२, ३०७, ४६०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात मुख्य आरोपीस अटक करण्यात आली असून एका आरोपीचा शोध सुरु आहे. या आरोपींनी सन २०१० पासून नवनवीन सदस्य एकत्रित करुन संघटित गुन्हेगार टोळी निर्माण करुन टोळीतील सदस्यांचा आर्थिक व इतर फायद्यासाठी दहशत निर्माण करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३ (१) (I) (II), ३(२), ३(४) हे वाढीव कलम लावण्यात आले असून गुन्हा तपासाधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात चौदा कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्याबाबत**

**(४२) ३०५०९ (१३-०४-२०१७). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौदाव्या वित्त आयोगांतर्गत राज्यात चौदा कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौदा कौटुंबिक न्यायालयापैकी विधी व न्याय विभागाने मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रबंधकांना पत्र लिहुन प्रस्तावित लातुर, बीड, उस्मानाबाद, जालना आणि परभणी ही पाच ठिकाणे वगळण्यात यावीत असे पत्राद्वारे विचारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान या पाच जिल्हयाच्या प्रमुख न्यायाधिशांना पत्र पाठवुन कौटुंबिक न्यायालयाचा वार्षिक खर्च, न्यायाधिश आणि सहाय्यभूत कर्मचारी वर्गाच्या वेतनावरील खर्च इत्यादी बाबींची माहिती मागितली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) चौदावा वित्त आयोगांर्तगत राज्यात १४ कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या प्रस्तावानुसार उच्चस्तरीय संनियंत्रण समितीने घेतलेला आहे.

(२) १४ व्या वित्त आयोगांतर्गच्या लातूर, बीड, उस्मानाबाद, जालना आणि परभणी या ५ ठिकाणाबाबतची अतिरिक्त माहिती मा. उच्च न्यायालयाकडून मागविण्यात आली होती.

(३) होय.

(४) व (५) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाकडील माहिती विचारात घेऊन बीड, जालना, उस्मानाबाद व परभणी येथील कौटुंबिक न्यायालयांच्या बाबतीत पदनिर्मितीचे आदेश दिनांक १५/०६/२०१७ रोजी निर्गमित केले आहेत. तर लातूर येथील कौटुंबिक न्यायालय दिनांक ०१/०४/२०१७ पासून सुरु झाले आहे.

---

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत (MACP) पशुधन आधार सेवा प्रकल्पाच्या योजना उर्वरित जिल्हयात राबविण्याबाबत**

**(४३) ३०७७७ (१५-०४-२०१७). श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत (MACP) पशुधन आधार सेवा प्रकल्पाला आगामी वर्षासाठी (२०१६-१७) रूपये ९ कोटी १३ लाखांचा निधी शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील फक्त १२ जिल्हयात उक्त प्रकल्पाचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित जिल्ह्यात उक्त योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी रु. १.६३ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जागतिक बँकेच्या निर्देशानुसार या प्रकल्पाच्या अंमलबजावणी अंतर्गत महाराष्ट्रातील केवळ अहमदनगर, यवतमाळ, अमरावती, वाशिम, बुलढाणा, नागपूर, सोलापूर, सातारा, पुणे, धुळे, जळगांव, कोल्हापूर, नाशिक, भंडारा, गोंदिया आणि बीड या एकूण १६ जिल्हयांमधील २० मोठया जनावरांचे बाजार व ४ शेळया-मेंढयांच्या बाजारांचे आधुनिकीकरण करावयाचे असल्याने सुरुवातीला हे १६ जिल्हे निवडण्यात आले होते. उपरोक्त जिल्हयांपैकी गोंदिया जिल्हयामध्ये मोठया जनावरांच्या बाजारासाठी पुरेशी जागा उपलब्ध न झाल्यामुळे तसेच, नागपूर जिल्हयातील सावनेर येथे अंतिम निवड झालेल्या कंत्राटदारास बाजार समिती, सावनेर यांनी स्विकृती पत्र न दिल्यामुळे सदर बाजाराची निवड रद्द करण्यात आलेली आहे. तसेच, जळगांव व सोलापूर या जिल्हयांमध्ये प्रकल्पांतर्गत आयोजित करावयाच्या आरोग्य शिबिरांचे उद्दीष्ट पूर्ण झाल्याने हे दोन व गोंदिया व नागपूर असे ४ जिल्हे वगळून सद्य:स्थितीत सदरचा प्रकल्प उर्वरित १२ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे.

जागतिक बँकेने सदरचा प्रकल्प उपरोक्त १६ जिल्हयांव्यतिरिक्त इतर जिल्हयांमध्ये राबविण्यास मान्यता प्रदान केली नसल्याने राज्यातील उर्वरित जिल्हयांमध्ये सदरचा प्रकल्प राबविण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद येथील राज्य परिवहन महामंडळाच्या वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४४) ३०८०२ (१५-०४-२०१७). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद येथील राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचारी वसाहतीची दुरवस्था झाली असल्याने जीर्ण व मोडकळीस आलेल्या दोन इमारती रिक्त करून कर्मचाऱ्यानी वास्तव्य करणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची पुनर्बांधणीबाबत कर्मचाऱ्यांनी मागणी करूनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार इमारतीची पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) उस्मानाबाद येथील राज्य परिवहन महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निवासस्थान असलेली इमारत सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई सायन (पूर्व) येथील शीला को.ऑ.सोसायटीतील सदस्याने अनधिकृतरित्या पोटमाळ्याचे काम केल्याबाबत**

**(४५) ३०८७३ (१४-०४-२०१७). ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सायन (पूर्व) येथील शीला को.ऑपरेटीव्ह सोसायटीतील सभासदाने स्वत:च्या मालकीच्या घरात सोसायटी तसेच महापलिका प्रशासनाची परवानगी न घेता निवासी घरात पोटमाळा काढून कुबेर आयुर्वेदिक भांडार उघडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सोसायटीतील सदस्याने अनधिकृतपणे पोटमाळा काढल्याबाबत तसेच निवासी इमारतीत आयुर्वेदिक भांडार उघडल्याबाबतची तक्रार सोसायटीच्या पदाधिकारी व रहिवाश्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ नॉर्थ वार्ड यांचेकडे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदरचे बांधकाम निष्कासित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) महानगरपालिकेमार्फत सदर पोटमाळयाची दिनांक १६/०५/२०१७ रोजी

पाहणी केली असता, सदर पोटमाळयाचे बांधकाम हे सद्य:काळात झाल्याचे आढळून आले नाही.

तसेच, सदर दुकानांच्या रांगेत फक्त एका दुकानाव्यतिरिक्त सर्व दुकान मालकांनी अशाच प्रकारे तळमजल्याची उंची वाढविल्याचे दिसून आले.

त्यामुळे तक्रारदाराच्या तक्रारीवरुन सर्व दुकानधारकांस महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका १८८८ च्या कलम ३४७-सी नुसार सत्यपडताळणीकरिता नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच, सदर इमारतीच्या संरचनात्मक परीक्षण अहवालासाठी महानगरपालिकेमार्फत दिनांक १७/०५/२०१७ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५३-ब अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे.

सदर अहवाल प्राप्त न झाल्यास सर्व ताबेदार आणि मालकांविरुध्द न्यायालयीन खटला दाखल करण्यात येणार आहे.

---

**राज्यातील खाजगी धर्मादाय शैक्षणिक संस्थांना विशेष अनुदान मंजूर होणेबाबत**

**(४६) ३७०५५ (१६-०५-२०१३). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी धर्मादाय संस्था संचलित शासन मान्यता प्राप्त शाळा-महाविद्यालये यांना आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनेसाठी विशेष अनुदान मंजूर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी (नाशिक) मा.मुख्यमंत्री, मा.वित्त व नियोजन मंत्री, मा.नगर विकास राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक १५ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) अद्याप पर्यंत निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविण्यात येते. खाजगी धर्मादाय संस्था संचलित शासन मान्यता प्राप्त शाळा-महाविद्यालये यांना आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनेसाठी अनुदान मंजूर करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील चाळीस रुग्णालयांपैकी सुमारे ३४ रुग्णालयाच्या तपासणीत कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याबाबत

**(४७) ४३१८२ (३०-८-२०१३) डॉ.(श्रीमती) निलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मादाय रुग्णालयाच्या नुकत्याच झालेल्या तपासणी दरम्यान पुणे शहरातील ४० रुग्णालयांपैकी सुमारे ३४ रुग्णालयाच्या तपासणीत कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्रुटी आढळून आलेल्या ३४ रुग्णालयांना धर्मादाय आयुक्तालयाने नोटीसा बजावून ३१ मे पर्यंत उत्तरे देण्याची मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती रुग्णालयांनी सदर नोटीसांना उत्तरे दिली आहेत, त्या रुग्णालयांची नावे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) पुणे शहरातील उपरोक्त सर्व ३४ रुग्णालयांनी नोटीसींना उत्तरे दिली आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :

१. सह्याद्री हॉस्पिटल, २. मोहिनतारा हॉस्पिटल, ३. रुबी हॉल क्लिनीक, ४. महात्मा गांधी नेत्र रुग्णालय, ५. प्रयाग हॉस्पिटल, ६. के ई एम हॉस्पिटल, ७. जोशी हॉस्पिटल, ८. कोकलिया पुणे फॉर हिअरींग ॲण्ड स्पिच हॉस्पिटल, ९. अक्षय मेडिकल फाँडेशन संचलित परमार हॉस्पिटल, १०. पुना हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, ११. अक्षय मेडिकल फौंडेशन संचालित परमार हॉस्पिटल, १२. वैद्य पुरुषोत्तम शास्त्री नानल रुग्णालय, १३. सुतिका सेवा मंदिर रुग्णालय, १४. संचेती इन्स्टियुट फॉर ऑर्थोपेडिक ॲण्ड रिहॅबिलीटेशन सेंटर, १५. संजीवनी हॉस्पिटल, १६. इनामदार मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, १७. द्वारीका संगमनेरकर मेडिकल फाऊन्डेशन, १८. हर्डीकर हॉस्पिटल, १९. रत्ना हॉस्पिटल, २०. दिनानाथ मंगशेकर हॉस्पिटल, २१. कवडे नर्सिग होम, २२. महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचालित साने गुरुजी आरोग्य मंडळ, २३. दिनदयाळ मेमोरियल हॉस्पिटल, २४. हर्षवर्धन मेडिकल सोसायटी यांचे मीरा हॉस्पिटल, २५. भारती हॉस्पिटल, २६. धन्वंतरी मेडिकल फॉडेशन ट्रस्ट, २७. डॉ. भाऊसाहेब सरदेसाई तळेगांव रुरल हॉस्पिटल, २८. लोकमान्य मेडिकल फॉडिशन, २९. लोकमान्य हॉस्पिटल, ३०. तळेगांव जनरल हॉस्पिटल, ३१. सेवाधाम हॉस्पिटल, ३२. मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, ३३. सुबुध हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, ३४. हरजीवन मेडीकल फौंडेशन.

----------------

**मौजे घाटकोपर येथील जागा कमी झाल्याबाबत**

**(४८) ४८८८६ (०७-०७-२०१४). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ४२२४२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घाटकोपर, ता. कुर्ला सर्व्हे नंबर १३६ पैकी टेकडीवजा सुमारे १०० एकर जमीन शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २१ फेब्रुवारी, १९९१ अन्वये मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्श्न्स प्रा.लि. यांना मंजूर करण्यात आली होती. तथापि प्रत्यक्षात दिनांक १२ मार्च १९९२ च्या न.भू.अ. यांच्या अहवालानुसार जागा मोजणी करुन एकूण क्षेत्र १७७८६२.२३ चौ.मी. म्हणजेच ४४ एकर क्षेत्रच झाडे लावण्यासाठी ताब्यात देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.हिरानंदानी कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. यांना एकूण ४४ एकर जमीन झाडे लावण्याच्या प्रयोजनाकरिता मंजूर करण्यात आली असून त्या जमिनीचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त ४४ एकर जमिनीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मे. हिरानंदानी कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना झाडे लावून त्यांची जोपासना करण्याकरिता अनुज्ञाप्तीने प्रदान केलेली ४४ (१७७८६२.२ चौ.मी.) जमीन त्यांचे कब्जात आहे. सदर जमिनीचा वापर झाडे लावण्याकरिता होत असून, जमीन डोंगर उताराची आहे व जमिनीस काही ठिकाणी तारेचे कंपाऊंड घालण्यात आलेले आहे. सदर जागत झाडे लावण्यात आली असून झाडांना पाणी देण्यासाठी पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत. तसेच सुरक्षा रक्षकांसाठी केबीन बांधण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त प्रदान केलेल्या जमिनीपैकी २०५३.०० चौ.मी. क्षेत्रावर लगतच्या झोपडपट्टीचे अतिक्रमण झाले आहे.

सदरच्या अतिक्रमणामुळे मुळ जमीन प्रदान आदेशातील अट क्र. ४ चा भंग झाला आहे. सदर शर्तभंगामुळे अनुज्ञप्तीधारक यांना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सुनावणी देऊन सदरहू २०५३,०० चौ.मी. क्षेत्रावरील अनधिकृत अतिक्रमण तीन महिन्यात निष्कासित करण्याचे व अतिक्रमण निष्कासनाचा खर्च भाडेपट्टेदार यांनी करण्याबाबतचे आदेश पारित केले आहेत.

---

## राज्यातील विविध शहरामध्ये बोगस आयुर्वेदिक औषधांची रस्त्यावर विक्री करणारे अनेक भोंदू वैद्य नागरिकांची फसवणूक करीत असल्याबाबत

**(४९) ५०५७१ (०१-०७-२०१४). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई प्रमाणे राज्यातील विविध शहरामध्ये बोगस आयुर्वेदिक औषधांची रस्त्यावर विक्री करणारे अनेक भोंदू वैद्य नागरिकांची फसवणूक करीत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावर आयुर्वेदिक औषधांची विक्री करणा-या भोंदू वैद्यांना रोखण्याबाबत तसेच त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१७) :** (१) होय.

(२) सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील आयुर्वेदिक औषधांची रस्त्यावर विक्री करणारे अनेक भोंदू वैद्या नागरिकांची फसवणूक करीत असल्याबाबत एक गुन्हा दाखल असून तो पो.ठाणे - माळशिरस, जि.सोलापूर गुरंन ८४/१५ भादंविक ४१९, ४२०, १७ इंडियन मेडिकल कौन्सील ॲक्ट कलम १५(२) व महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशन ॲक्ट कलम १५(२) व महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशन ॲक्ट कलम ३३ (२) प्रमाणे आरोपी १) शुभेन देवेंद्रनाथ बिसवास व आरोपी, २) शेखर सुशांत बिसवास दोघे, रा.काशीपुरा, ता.हावडा, पश्चिम बंगाल दिनांक ०४/०८/२०१५ रोजी १८.४५ वा.चे. सुमारास आरोपी नं.१ बिसवास यास अटक केली व दिनांक ०५/०८/२०१५ रोजी १०.४५ वा आरोपी नं. २ बिसवास यांस अटक केली आहे. आरोपी यांचेकडे कोणतेही वैद्कीय पदवी व नोंदणी प्रमाणपत्र नसतांना वैद्यकीय व्यवसाय करुन रुग्णांकडून पैसे घेऊन उपचार करीत असतांना आढळून आले. गुन्ह्याचा तपास सपोनि/शेंडगे करीत असून सदरचा गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## पुणे महानगर परिवहन सेवेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५०) ५१२५२ (०३-०७-२०१४). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने पीएमपीला गाड्यांची खरेदी पायाभूत सुविधांचा विकास, स्वस्त तिकिट दर, यासाठी किती तरतुद केली आहे,

(२) नसल्यास, मेट्रोसाठी हजारो कोटीची तरतुद तसेच एसटीसाठी विविध सवलती दिल्या जात असता मात्र पीएमपीला दुर्लक्षित करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पीएमपीला भरीव तरतुद करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, त्यावर अमंलबजावणी केव्हापर्यंत होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यास शासन निर्णय दिनांक ३/१२/२०१३ अन्वये रुपये ६ कोटी मंजूर करण्यात आले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे. मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.